।। सा विद्या या विमुक्तये ।।

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

Phone : (02462) 229242
Fax : (02462) 229574

ACADEMIC (APPROVAL) SECTION

Website : srtmun.ac.in
E-mail : approvalsrtmun@gmail.com


## परिपत्रक

### (जिल्हानिहाय कॅस कॅम्प केंद्रावर प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ)

प्रस्तुत विद्यापीठाशी सर्व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयांच्या मा.प्राचार्यांना या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापकांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विनियमानुसार **Stage I to II, ALV–11 (AGP-7000)** व **Stage II to III, ALV–12 (AGP-8000)** करीता सेवा अंतर्गत प्रगती योजना (Career Advancement Scheme-CAS) अंतर्गत स्थाननिश्चिती/पदोन्नतीकरीता खालील जिल्हानिहाय केंद्रांवरती छाननी समिती (Screening Committee) बैठकीचे आयोजन करण्यात आलेले आहे.

| अनु.क्र. | जिल्हा | कॅस कॅम्प केंद्राचे नांव |
|---|---|---|
| १ | नांदेड | सायन्स कॉलेज, नांदेड. |
| २ | लातूर | महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातुर |
| ३ | परभणी व हिंगोली | कै. सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी |

यापुर्वी या कार्यालयाचे परिपत्रक क्र. शैक्षणिक/मान्यता/०२/२०२५–२०२६/१६२१, दिनांक ०९/०५/२०२६ अन्वये पात्र सहाय्यक प्राध्यापकांचे ALV–11 (Stage I to II) व ALV–12 (Stage II to III) चे परिपुर्ण प्रस्ताव उपरोक्त जिल्हानिहाय कॅस कॅम्प केंद्रावर दिनांक २०/०५/२०२६ पर्यत दाखल करावेत असे कळविण्यात आले होते.

मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशान्वये कळविण्यात येते की, दिनांक ३० जुन, २०२६ पर्यत किंवा त्यापूर्वी स्थाननिश्चितीसाठी पात्र होणारे सहाय्यक प्राध्यापकांचे प्रस्ताव उपरोक्त जिल्हानिहाय केंद्रावरती **दिनांक ३० जुन, २०२६ पर्यत सादर करणे बाबत या परिपत्रकान्वये मुदतवाढ देण्यात येत आहे.** सदर मुदतवाढ आपल्या महाविद्यालयातील शिक्षकांच्या निर्देशनास आणुन द्यावी व त्यांचे प्रस्ताव विहीत मुदतीत संबंधीत जिल्हानिहाय केंद्राकडे सादर करावेत.

**सदर मुदती नंतर प्राप्त होणा–या प्रस्तावांवर कार्यवाही केली जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी, ही विनंती.**

'ज्ञानतीर्थ' विष्णुपुरी, नांदेड. §
जा.क्र.शैक्ष/मान्यता/कॅस/०२/२०२५–२६/1690 §
दिनांकः २२/०५/२०२६ §

सहाय्यक कुलसचिव
शैक्षणिक (मान्यता) विभाग

प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तवः

१) **मा.प्राचार्य, सर्व संलग्नीत अशासकीय अनुदानीत महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ यांना कळविण्यात येते की, शिक्षकांच्या स्थाननिश्चिती प्रस्तावास विद्यापीठाचे मान्यता पत्र निर्गमित झाल्यानंतर त्यांच्या कडील एक प्रस्ताव मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड यांच्या कार्यालयाकडे वेतन निश्चितीसाठी देण्यात यावा.**
२) **मा.प्राचार्य,** सायन्स कॉलेज, नांदेड.
३) **मा.प्राचार्य,** कै.सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी.
४) **मा.प्राचार्य,** महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातुर.
५) **मा.शिक्षण सहसंचालक,** (उच्च शिक्षण) शिक्षण सहसंचालनालय, नांदेड विभाग, नांदेड.
६) **सिस्टीम एक्सपर्ट,** शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.